# स्त्रीवादी चळवळ एक दृष्टीक्षेप

शोधपत्र-समाजशास्त्र

* प्रा. कु. महानंदा राऊतखेडकर

**कार्यक्षेत्र व संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधन निबंधासाठी कोणत्याही गावाची, शहराची मर्यादा न ठेवता उपलब्ध झालेल्या दुय्यम तथ्य सामुग्रीचा आधार घेण्यात आला आहे.

**संशोधन आराखडा :**

प्रस्तुत संशोधन निबंधासाठी वर्णनात्मक-विश्लेषणात्मक संशोधन आराखड्याचा उपयोग करण्यात आला आहे.

**उद्देश:**

स्त्रीवादाचा अर्थ, उद्देश व प्रकार यांचे अध्ययन करणे.

**व्याप्ती व मर्यादा :**

स्त्रीवादी चळवळीचे भारताच्या व जगाच्या संदर्भात अत्यंत व्यापक विस्तृत क्षेत्र आहे. तरीही प्रस्तुत संशोधन निबंधाला स्थळाच्या, काळाच्या व वेळेच्या निश्चितच मर्यादा आहेत. त्यामुळे या संशोधन निबंधाची व्याप्ती अत्यंत मर्यादीत आहे.

**स्त्रीवादाचा अर्थ :** "स्त्रीवाद" ही एक राजकीय जाणिव आहे. तो एक सम्यक परिवर्तनवादी दृष्टीकोन आहे. १९६४-६५ च्या सुमारास भारतीय स्त्रियांचा दर्जाविषयक अहवाल प्रसिद्ध झाला आणि स्वतंत्र भारतातील स्त्रियांची चळवळ नव्या पायावर उभी राहिली.

ह्या चळवळीतून आलेल्या अनेक नव्या विचारांतून भिन्न स्त्रीवादी विचार प्रवाह विकसित झाले[(१)] "स्त्रीवाद", "नवा स्त्रीवाद" आणि "स्त्रियांच्या चळवळी" या संज्ञा सामान्यत: भिन्न अर्थाने वापरल्या जातात. रूढ व्याख्येनुसार सर्वसामान्यत: स्त्रीवाद म्हणजे स्त्रियांच्या हक्कासंबंधी भूमिका तर स्त्रीमुक्तीचा अर्थ स्त्रियांना संपूर्ण स्वातंत्र्य स्त्री-चळवळीच्या इतिहासकार गेल थेटस् यांनी दाखविल्याप्रमाणे 'स्त्री-मुक्ती' ही संज्ञा सरसकटपणे 'नवा स्त्रीवाद'या संज्ञेसाठी वापरली जाते. खरे तर 'स्त्री-मुक्ती' ही संज्ञा अधिक मुलभूत आणि आक्रमक राजकीय विचारसरणी अंगिकारणाऱ्या स्त्रियांच्या संदर्भात जाणीवपूर्वक निर्माण केली गेली[(२)].

**स्त्रीवादाचा उद्देश :**

स्त्रियांना बाईपणामुळे अन्याय सहन करावा लागतो. स्त्रीचे असणारे दुय्यमत्त्व हे व्यवस्थात्मक आहे आणि असे दुय्यमत्त्व सर्व समाजात असते या गृहितकावर आधारित सर्व स्त्रीवाद्यांनी आपली वाटचाल सुरू ठेवली आहे[(३)]. स्त्रीवाद्यांनी विषमतेचा सर्वसाधारण ढाचा, रूढी, परंपरा (प्रमाण-मानके) आणि संस्था याविषयी अनेकविध सिद्धांत प्रस्थापित केले आहेत. यामध्ये विशिष्ट अनुभवांचे विश्लेषण करून, स्त्रियांचे दुय्यमत्त्व समजून घेऊन ते बदलण्यासाठी प्रयत्न करण्याची दिशा दिग्दर्शित केली आहे. स्त्रीवादाचे महत्त्वाचे योगदान असे आहे की, लिंगभेदातून निर्माण होणाऱ्या विषमतेला छेद देण्यासाठी, त्याला राजकीयदृष्ट्या संक्रमित करण्यासाठी कोणती व्यूहरचना असावी याविषयी मार्ग सुचविले जातात.

जीवनाच्या सर्व क्षेत्रामध्ये होणारे स्त्रियांचे शोषण आणि दुय्यमत्त्व नष्ट करणे हाच स्त्रीवादाचा उद्देश आहे[(४)] स्त्रियांवर झालेल्या जुलूमांचे मुळ कारण कोणते? आणि हा जुलूम संपविण्यासाठी कोणता मार्ग स्वीकारावा? या दोन प्रश्नांच्या संदर्भामध्ये घेतल्या जाणाऱ्या भूमिकेनुसार स्त्रीवादामध्ये तीन प्रमुख प्रवाह निर्माण झाले आहेत ते पुढीलप्रमाणे :-

**१) उदारमतवादी स्त्रीवाद :-**

या प्रकारातला स्त्रीवाद इतका सर्वंकष आहे की, पुरुषप्रधान समाजव्यवस्था स्त्रीचेच नव्हे तर पुरुषांचेही शोषण करते, यासारख्या विचार मान्य करत समाज व समाजाची घडण यावर लैंगिक भेदांचे होणारे परिणाम हा या प्रकाराचा गाभा आहे. सामाजिक बदल कायदेकानून बदल करून घडविता येतात, हा विश्वास या प्रकारात मूलभुत असल्याने 'समान वेतन हक्क', 'स्त्री-पुरुष भेदभाव करणाऱ्याविरूद्ध कायदा' यासारख्या संकल्पना या प्रकारात मोडतात. स्वत: वुलस्टनक्राफ्टन या स्त्रीवादाचे आदर्श उदाहरण आहे, तर सफ्रोजेन चळवळ, ॲन ऑकले ही विसाव्या शतकातली काही उदाहरणे ठरावीत.[(५)]

**२) मूलगामी स्त्रीवाद :-**

१९६० पासून फोफावत गेलेल्या या स्त्रीवादात मात्र स्त्री व पुरुषात जाणिवपूर्वक फरक केला जातो. 'माणूस' या उदारमतवादी संकल्पनेपेक्षा स्त्री-पुरुष भेदाभेद या प्रकारात इतके महत्त्वाचे ठरतात की, अेलेन शेवॉल्टर सारखी स्त्रीवादी विचारवंत 'गायनोक्रिटीसिझम' पूर्णत: स्त्रीकेंद्रीत विचारांचा आराखडा मांडू इच्छिते. पुरुषप्रधान व्यवस्था सार्वत्रिकचं असल्याने स्त्रीचे होणारे शोषण व त्याविरूद्ध स्त्रीची लढाई या प्रकाराचा गाभा आहे. म्हणूनच 'पर्सनल इज पोलिटिकल' ही या स्त्रीवादाची घोषणा आहे. कुटूंबव्यवस्था, घरगुती काम, बालसंगोपन

* समाजशास्त्र विभाग, पीपल्स कॉलेज, नांदेड ( महाराष्ट्र )

इत्यादी क्षेत्रात बाह्यक्षेत्राइतकीच स्त्रीची गळचेपी, घुसमट होते असे या स्त्रीवाद्यांचे मत आहे. स्त्री-पुरुषाच्या शारीरिक, मानसिक, वाचिक, वैचारिक हिंसाचाराला बळी पडत जाते हे स्त्रीवाद स्पष्ट करतो. समलैंगिकता हाच त्यावर उपाय आहे अशी टोकाची भूमिका या प्रकारातून जन्माला आली. केट मिलेट, सुझन ब्राऊनमिलर, शुलामिथ फायरस्टोन, अड्रीअन रीश, ग्लोरिआ स्टाईमन, बेटी प्रीडन, अेलेन शोवॉल्टर, सँट्रा गिल्बर्ट, सुझन गुबर यांसारखे विचारवंत या प्रकारात मोडतात.[६]

**३) मार्क्सवादी समाजवादी स्त्रीवाद :**

मार्क्सवादी-समाजवादी स्त्रीवाद हा स्त्रीवादाचा तिसरा प्रकार पुरुषप्रधान व्यवस्थेचा सांधा जोडतो. भांडवलशाहीशी स्त्रीवर होणारा अन्याय हा आर्थिक शोषण व त्यातून निर्माण होणारे वैचारिक दांडगेपण यामुळे घडतो असे हा स्त्रीवाद मानतो. या स्त्रीवादाचे दोन प्रकार आहेत.

**अ) मार्क्सवादी स्त्रीवाद :-**

स्त्रीचे शोषण कौटूंबिक व सामाजिक या दोन्ही पातळ्यांवर होते व त्यामुळे भांडवलशाहीला हातभार लागतो असे हा स्त्रीवाद मानतो.

**ब) मार्क्सवाद/समाजवादी विचार :-**

उत्पादकता, उत्पादनप्रणाली, उत्पादन प्रक्रियेची मालकी, श्रममूल्यांचा विचार या तत्त्वांचा हा स्त्रीवाद अभ्यास करतोच पण त्या पलिकडे जाऊन, वैचारिकता, मानसिकता कशी घडते व त्यातूनच स्त्रीला कशी घडविते याचा विचार या स्त्रीवादाला महत्त्वाचा वाटतो.[७]

**४) आधुनिकोत्तर स्त्रीवाद :**

या विचारमंथनात वर्गभेद व स्त्रीवाद याचा विचार जरूर होतो पण वंशवाद व स्त्रीचित्रण यांची सांगड घालणे अतिशय गरजेचे आहे. त्यामुळे आधुनिकोत्तर स्त्रीवाद वंश, भाषाशास्त्र, मानसशास्त्र इत्यादी संकल्पनांचा आधार घेऊन स्त्रीवादाच्या पर्यायी संकल्पना पुढे आणते. ज्युलिएट मिशेलं, केट मिलेट, अेलेन शोवॉल्टर, ल्युस इरिगिरे, अेलेन क्यूक्स हे पाश्चिमात्य व आफ्रिकी-अमेरिकन किंवा वसाहतवादोत्तर समीक्षेतून पुढे आलेले गायत्री चक्रवर्ती-स्मिवॅक यांचे विचार या प्रकारात मोडतात.[८] वरीलप्रमाणे स्त्रीवाद म्हणजे काय? त्याचा अर्थ, उद्दिष्ट व स्त्रीवादाचे प्रकार वरीलप्रमारे स्पष्ट करता येतील.

## सन्दर्भ ग्रन्थ

१) अब्राह्मणी स्त्रीवादी इतिहास लेखनाच्या दिशेने ...... संपादक : विद्युत भागवत, प्रतिमा परदेशी, पृष्ट प्रास्ताविक ४ २) ए रिव्हयु ऑफ द थेअरेटिकल कॉन्ट्रीब्यूशन मेड बाय सम ऑफ द रिसेंट लिडिंग फेमिनिस्टस् इन द वेस्ट' डॉक्टरस थिसिस अनपब्लिशड् - १९८५) - विद्युत भागवत ३) व्हेलहन, इमेल्डा मॉडर्न फेमिनिस्ट थॉट - फ्रॉम द सेकंड वेव्ह टू 'पोस्ट फेमिनिझम', एडिनबरो युनिव्हर्सिटी प्रेस, एडिनबरो (१९९५) ४) स्टेसी, जॅकी 'अनटँगलिंग फेमनिस्ट थेअरी' - आर्टिकल पब्लिशड् इन रिचर्डसन अॅण्ड रॉबिन्सन व्हिक्टोरिया (एडि.) 'इनट्रोड्युसिंग वुमेन्स स्टडीज', मॅकमिलन प्रेस, लंडन - १९९३ ५) बायजा/सप्टेंबर-ऑक्टोबर २००६, पृ.३२ व ३८ ६) कित्ता, पृ. क्रं. ३३ ७) कित्ता, पृ. ३३ व ३४ ८) कित्ता, पृ. ३३ व ३४